जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2023 तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागास डिपेक्स पारितोषिक

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सृजन ट्रस्ट, पुणे व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्यामार्फत आयोजित डिपेक्स-२०२३ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागास इंडस्ट्रियल अटोमेशन या विभागातून 'अॅटोमॅटीक कॉन्टॅक्टलेस भेळ व्हेंडिंग मशीन' या अभिनव प्रकल्पाकरीता राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



**कोल्हापूर : डिपेक्स-२०२३ स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. ए. बी. कोळेकर, प्रा. हर्षवर्धन पंडीत आदी.**

कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते अंतिम वर्ष मेकॅनिकल इंजिनियरिंगचे विद्यार्थी सौरव बेन्नूरकर, सर्वेश्वर देसाई, विशाल पाटील, आशिष माने व प्रकल्प मार्गदर्शक प्रा. हर्षवर्धन पंडित यांचा सत्कार करण्यात आला. या प्रकल्पाला प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी संशोधनातून साकारलेल्या तंत्रविषयक आविष्काराला एक व्यासपीठ उपलब्ध होण्यासाठी सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात ७ ते ९ एप्रिल दरम्यान ३२ व्या डिपेक्स अंतर्गत प्रदर्शन व स्पर्धा झाली. डिपेक्सचे उदघाटन केंद्रीय रस्ते, परिवहन व राज्यमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, 'पॅकर्स' तर्फे क्रिकेट प्रशिक्षण शिबिर

कोल्हापूर : पॅकर्स क्रिकेट क्लब आणि शिवाजी विद्यापीठातर्फे 'कॅच देम यंग' या मोहिमेखाली १३ व १४ वर्षांच्या होतकरू खेळाडूंसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन केले आहे. हे उन्हाळी शिबिर १५ दिवसांचे असणार आहे. विद्यापीठाच्या मैदानावर बीसीसीआयचे लेव्हल ३ प्रशिक्षक प्रदीप इंगळे हे मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरासाठी फक्त वीस खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. तसेच वर्षभर शारीरिक क्षमता, क्रिकेटमधील बारकावे, मानसिक संतुलन, आहार या विषयावर मार्गदर्शन करण्यात येईल, अशी नंदकुमार बामणे यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या जपानी चित्रपट, खाद्य प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी यांच्या संयुक्त विद्यमाने जपानी चित्रपट व परदेशी खाद्यपदार्थ प्रदर्शन कार्यक्रम आयोजित केला आहे. विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'दृष्टी' या उपक्रमांतर्गत दि. १८ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत वि. स. खांडेकर सभागृह, भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ येथे 'रि-लाइफ' हा जपानी (इंग्रजी उपशीर्षकासह) चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ ते ७ या वेळेत डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटीतर्फे विदेशी खाद्यसंस्कृतीचा परिचय करून देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

17 APR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांची कळंबा कारागृहास भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधि विभागातील विद्यार्थ्यांनी कळंबा मध्यवर्ती कारागृहास भेट दिली. कारागृहातील कामकाजाची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी कळंबा कारागृहात कैद्यांसाठी असलेल्या सोयी-सुविधा, रुग्णालय, भोजन व्यवस्था, बेकरी, लाडू विभाग, ग्रंथालय, रेडिओ स्टेशन, कारखाना, शेती याबाबतची माहिती घेतली.

कारागृह अधीक्षक पांडुरंग भुसारी यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर बाबींसह कैद्यांच्या अधिकारांबद्दल मार्गदर्शन केले. कारागृहात आलेल्या कैद्यांचे मतपरिवर्तन होऊन त्याच्यात सुधारणा व्हावी. शिक्षा संपल्यानंतर समाजात तो स्वत:च्या पायावर उभा राहावा, यासाठी विविध उपक्रम राबवले जातात, असे भुसारी यांनी सांगितले.

अभ्यास दौऱ्याचे विभागप्रमुख डॉ. विवेक धूपदाळे यांनी कळंबा कारागृह भेटीचा उद्देश स्पष्ट केला.

यावेळी तुरुंगाधिकारी प्रकाश लोमटे, पोलिस कर्मचारी महेंद्र पाटील. ओंकार वागडोळे यांच्यासह विधी विभागाचे सचिव प्रमोद दाभाडे आणि विद्यार्थी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या विधि विभागातील विद्यार्थ्यांनी कळंबा मध्यवर्ती कारागृहास भेट देत कामकाजाची माहिती घेतली.

पुढारी




मेरठ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारा शिवाजी विद्यापीठ संघ.

# आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मेरठ (उत्तर प्रदेश) येथील चौधरी चरणसिंह विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ (पुरुष) संघाने बलाढ्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संघावर दोन गुणांनी मात करून सुवर्णपदक पटकावले. २०१२ पासून शिवाजी विद्यापीठ संघास सुवर्णपदक हुलकावणी दिली होती. यापुर्वी संघाला ४ ब्रॉंझ पदक प्राप्त केले होते. १२ वर्षांनी संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

विजेत्या संघातील खेळाडू- रोहन शिंगाडे, अर्णव पाटणकर, शुभम लगारे, रोहन कोरे, सौरभ घाडगे, सागर गायकवाड, काशिलिंग हिरुकुब, प्रद्युम पाटील, अरुण सावंत, अतिक शेख, अशितोष पवार, स्वराज चौगुले, राजवर्धन पाटील, अनिकेत पोटे, राकेश काकूमुनी, सदर संघास प्रशिक्षक म्हणून डॉ. देवेंद्र बिरनाळे, संघ व्यवस्थापक म्हणून हर्षवर्धन पाचोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# जपानी चित्रपट व परदेशी खाद्यपदार्थ प्रदर्शन उद्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (ता. १८) जपानी चित्रपट व परदेशी खाद्यपदार्थ प्रदर्शन होत आहे. 'दृष्टी' उपक्रमांतर्गत वि. स. खांडेकर भाषाभवन येथे दुपारी ४ ला त्यास सुरवात होईल. 'रि-लाइफ' (ReLIFE) हा जपानी (इंग्रजी उपशीर्षकासह) चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. चित्रपट प्रदर्शनानंतर विदेशी खाद्यसंस्कृतीचा परिचय करून देण्यात येणार आहे. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हॉस्पिटॅलिटी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या परदेशी पदार्थांचा अगदी माफक दरात आस्वाद घेता येईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

1 7 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास खो-खोत सुवर्णपदक

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा; औरंगाबाद संघावर विजय

कोल्हापूर, ता. १६ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाने सुवर्णपदक पटकावले. अत्यंत चुरशीच्या लढतीत शिवाजी विद्यापीठ संघाने बलाढ्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संघावर दोन गुणांनी मात केली. या स्पर्धा मेरठ (उत्तरप्रदेश) येथील चौधरी चरणसिंह विद्यापीठात सुरू आहेत. विजेत्या संघात इचलकरंजी शहरातील पाच खेळाडूंचा समावेश आहे. तब्बल बारा वर्षांनंतर सुवर्णपदकाचा मानकरी होण्याचा मान शिवाजी विद्यापीठाला मिळाला आहे.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिले संरक्षण करताना शिवाजी विद्यापीठ संघाचे सात खेळाडूच बाद झाले; तर औरंगाबाद संघाचे देखील सात खेळाडू बाद केले. पहिल्या डावात गुणफलक समान राहिल्याने दुसऱ्या डावात चुरस रंगली. दुसऱ्या डावामध्ये शिवाजी विद्यापीठाने औरंगाबाद संघाचे नऊ खेळाडू बाद केले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाकडून प्रद्युम्न पाटील, अनिकेत पोटे, अतिक शेख, शुभम लगारे, सौरभ घाटगे यांनी उत्कृष्ट आक्रमण केले. दुसऱ्या डावतील दुसऱ्या फेरीत विजयासाठी औरंगाबाद संघास दहा गुण मिळविणे आवश्यक होते. परंतु नऊ मिनिटांच्या या सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या राजवर्धन पाटील, अर्णव पाटणकर यांचा अष्टपैलू खेळ व रोहन कोरे, रोहन शिंगाडे, कुणाला गायकवाड यांच्या भक्कम संरक्षणामुळे औरंगाबाद विद्यापीठाला केवळ आठ खेळाडू बाद करता आले. शिवाजी विद्यापीठ संघाने अवघ्या एक गुणांनी विजेतेपद पटकावले. विजयी संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शारिरीक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.




**मेरठ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेचे सुवर्णपदक पटकावलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

**विजयी संघातील खेळाडू, प्रशिक्षक**

रोहन शिंगाडे, अर्णव पाटणकर, शुभम लगारे, रोहन कोरे (सर्व नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स, इचलकरंजी), राकेश काकूमुनी (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), सौरभ घाडगे, सागर गायकवाड, काशिलिंग हिरुकुब (सर्व एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली), प्रद्युम्न पाटील, अरुण सावंत, अतिक शेख (सर्व केडब्ल्यूसी कॉलेज, सांगली). अशितोष पवार (डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी ), स्वराज चौगुले (एसके पाटील कॉलेज, कुरुंदवाड), राजवर्धन पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), अनिकेत पोटे (बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज ), प्रशिक्षक प्रा. डॉ. देवेंद्र बिरनाळे (नाईट कॉलेज, इचलकरंजी), संघ व्यवस्थापक हर्षवर्धन पाचोरे (केडब्ल्यूसी कॉलेज. सांगली)

तरुण भारत

# जपानी चित्रपट, खाद्यपदार्थ प्रदर्शन उद्यापासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलीटी यांच्या संयुक्त विद्यमाने जपानी चित्रपट व परदेशी खाद्यपदार्थ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. 'दृष्टी' या उपक्रमांतर्गत मंगळवार दि. १८ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत वि. स. खांडेकर सभागृह, भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ येथे 'रि-लाइफ' हा जपानी (इंग्रजी उपशीर्षकासह) चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. 'रि-लाइफ' चित्रपट आहे. चित्रपटांच्या मदतीने जगभरातील विविध देशातील भाषा व संस्कृतींचा परिचय होईल. होतो. चित्रपट प्रदर्शनानंतर डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलीटी संस्थेतर्फे विदेशी खाद्यसंस्कृतीचा परिचय करून देण्यात येणार आहे. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हॉस्पिटॅलीटी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या रशियन सँडवीच, फ्रेंच दानिश पेस्ट्री, जर्मन स्टोलन ब्रेड, जपानी ग्रीन टी शेक अशा परदेशी पदार्थ माफक दरात विक्रीसाठी उपलब्ध असतील. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

17 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कारागृहाला सुधारगृह हा समर्पक शब्द

## डॉ. विवेक धूपदाळे : विधी विभाग विद्यार्थ्यांची कळंबा कारागृहास भेट

■ **विद्यार्थ्यांनी जाणून घेतली नियम पद्धतींची माहिती**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांतर्गत मध्यवर्ती कळंबा कारागृहास भेट दिली. कारागृहातील विधी तसेच कायद्याशी निगडित विविध पद्धती, कारागृहातील नियम पद्धती या सगळ्यांची विद्यार्थ्यांना जवळून ओळख व्हावी म्हणून विभाग प्रमुख डॉ. विवेक धूपदाळे यांनी या अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते.

प्रास्ताविकात डॉ. विवेक धूपदाळे म्हणाले, कारागृहाला खरे तर सुधारगृह हा शब्द समर्पक मानला जातो. माणूस हा जन्मताच गुन्हेगार नसतो तर परिस्थिती, मानसिक स्थैर्य इत्यादी घटकांचा एकत्रित परिणाम व घडलेला गुन्हा याबाबत सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. कायद्याचे शिक्षण घेताना कायदा हा जास्तीत जास्त समाज उपयोगी अंमलात आणण्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच सभोवतालचे चौफेर ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. कळंबा कारागृहमधील शिस्त व उपक्रमाची त्यांनी स्तुती केली.

कारागृह अधीक्षक पांडूरंग भूसारी यांनी कारागृहातील सोयी सुविधा नियोजन, रुग्णालय, भोजन, बेकरी, लाडू विभाग, ग्रंथालय, रेडिओ स्टेशन, कारखाना, शेती याबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. बंदीजनाना शिक्षा भोगून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची हिंमत निर्माण व्हावी यासाठी कळंबा कारागृहात विशिष्ट उपाययोजना केल्या आहेत. यावेळी कारागृहातील कारखाने, हातमाग, सूतार काम, जरीवर्क, शेती, उच्च शिक्षण व इतर समाज प्रबोधन कार्यक्रम इत्यादी बाबत विद्यार्थ्यांना तुरुंगाधिकारी (द्वितीय श्रेणी) प्रकाश लोमटे, पोलीस कर्मचारी महेंद्र पाटील ओंकार वागडोळे यांनी माहिती दिली.

विधी विभागाचे सचिव (जी. एस.) प्रमोद दाभाडे म्हणाले, कळत नकळत हातून घडलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगताना गुन्हेगार म्हणून नावावर पडलेला शिक्का पुसणे सोपे काम नाही. कैद्यांनी स्वतःहून तसा प्रयत्न केला तरी समाज त्यांना सतत चुकीची जाणीव करून देतो. यातूनच कैद्याची मानसिकता बिघडते. अनेक बंदी नकारात्मक मानसिकतेमुळे पुन्हा गुन्हेगारी कृत्याकडे वळतात किंवा व्यसनाच्या आहारी जातात. त्यामुळे शिक्षा भोगून आलेल्या व्यक्तीला सतत केलेल्या गुन्ह्याची जाणीव करून न देता त्या व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्याचा वाढवण्यासाठी प्रयत्न करावा.

यावेळी प्रा. माधवी माळगे, प्रियंका जाधवर, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, प्रियंका गुरव, हेमा जाधव, तेजस्विनी कासे, अरविंद पाटील, गौरव जवळकर, जयदीप कदम, नागेश दरेकर, यश हेगडे –पाटील, नेहा राजपूत, अश्विनी पाटिल आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांनी कळंबा कारागृहास भेट दिली.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 APR 2023

तरूण भारत

# आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्ण

प्रतिनिधी
इचलकरंजी

मेरठ (उत्तर प्रदेश) येथील चौधरी चरणसिंह विद्यापीठमध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो–खो स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ (पुरुष) संघाने बलाढ्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघावर एका गुणांनी मात करून सुवर्णपदक प्राप्त केले.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने पहिले संरक्षण करताना सात खेळाडू बाद झाले. तर शिवाजी विद्यापीठ संघाने छत्रपती संभाजीनगर संघाचेही सात खेळाडू बाद केले. पहिल्या डावात गुणफलक समान राहिल्याने दुसऱ्या डावात दोन्ही संघाकडून प्रतिकार करण्यात आला. दुसऱ्या डावामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने बलाढ्य मराठवाडा विद्यापीठाचे नऊ खेळाडू बाद केले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाकडून प्रद्युम्न पाटील, अनिकेत पोटे, अतिक शेख, शुभम लगारे, सौरभ घाटगे यांनी उत्कृष्ट आक्रमण केले. दुसऱ्या डावातील दुसऱ्या फेरीत विजयासाठी मराठवाडा विद्यापीठ संघास दहा गुण मिळविणे आवश्यक होते. सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या राजवर्धन पाटील, अर्णव पाटणकर यांचा अष्टपैलू खेळ व रोहन कोरे, रोहन शिंगाडे, कुणाला गायकवाड या खेळाडूंच्या भक्कम संरक्षणमुळे मराठवाडा विद्यापीठाला केवळ आठ खेळाडू बाद करता आले. अशाप्रकारे रोमहर्षक सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने अवघ्या एक गुणांनी पराभव करून सुवर्णपदक प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, संचालक, शारिरीक शिक्षण व क्रीडा डॉ. शरद बनसोडे यांनी संघास दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.




**मेरठ : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धेत सुवर्णपदक मिळाल्यानंतर शिवाजी विद्यापीठ संघ.**

### तब्बल बारा वर्षानंतर सुवर्णपदक

२०१२ पासून शिवाजी विद्यापीठ संघास सुवर्णपदक हुलकावणी देत आले होते. दरम्यानच्या काळात विद्यापीठ संघाने ४ वेळा कांस्यपदक प्राप्त केले होते. तर दोन वेळा अंतिम फेरीत प्रवेश केला होता. मात्र, सुवर्णपदक प्राप्त करण्यात संघ अपयशी ठरत होता. त्यामुळे सुवर्णपदकाचा दुष्काळ संपविण्याच्या इराद्यानेच संघ मैदानात उतरला व सुवर्णपदक प्राप्त केले.

संघातील खेळाडू – रोहन शिंगाडे, अर्णव पाटणकर, शुभम लगारे, रोहन कोरे (चौघेही नाईट कॉलेज, इचलकरंजी), सौरभ घाडगे, सागर गायकवाड, काशिलिंग हिरुकुब (तिघेही एनडी पाटील नाईट कॉलेज, सांगली), प्रद्युम पाटील, अरुण सावंत, अतिक शेख (तिघेही केडब्ल्यूसी कॉलेज, सांगली). अशितोष पवार (डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी), स्वराज चौगुले (एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड ), राजवर्धन पाटील(डांगे कॉलेज, हातकणंगले), अनिकेत पोटे (बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज), राकेश काकूमुनी (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी). तसेच संघास प्रशिक्षक म्हणून डॉ. देवेंद्र बिरनाळे (नाईट कॉलेज इचलकरंजी), संघ व्यवस्थापक म्हणून हर्षवर्धन पाचोरे(एडब्ल्यूसी कॉलेज, सांगली).